मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई व राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयासाठी स्थायी अग्रीमाची रक्कम रु.५०००/- करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.एमसीटी-२०१८/प्र.क्र.५९/परि-५

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक : १८ एप्रिल, २०१८.

वाचा :- १) शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमसीटी ०१९९/१३/सीआर-२३/परिवहन-५, दिनांक २२.११.२०००.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.मआख-२०११/प्र.क्र.१९/२०११/विनियम, दिनांक ०८.०५.२०१४.

३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम,भाग-२, दिनांक १७.०४.२०१५.

४) प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,मुंबई यांचे क्र.मोअदान्या/आस्था/१००६/२०१७, दिनांक ३०.११.२०१७.

प्रस्तावना :-

प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,मुंबई व राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयासाठी शासन निर्णय, गृह विभाग क्र.एमसीटी-०१९९/१३/प्र.क्र.२३/परि-५, दिनांक २२.११.२००० अन्वये स्थायी अग्रीमाची रक्कम रु.७००/- प्रतिमाह मंजूर करण्यात आलेली आहे. दिवसेंदिवस वाढत असलेली महागाई लक्षात घेता सदरच्या रक्कमेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

मा.अध्यक्ष तथा विभाग प्रमुख, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण, मुंबई व राज्य परिवहन अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयासाठी स्थायी अग्रीमाची रक्कम रु.५०००/- (रुपये पाच हजार फक्त) प्रतिमाह करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे. सदर आदेश हा शासन निर्णय निर्गमित होण्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

२. सदर आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ मध्ये उधृत केलेल्या वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ मधील भाग पहिला, उपविभाग-दोन मधील अनुक्रमांक १२, नियम क्रमांक ५६ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०४१८१६५८३८३५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Kranti B. Patil

Digitally signed by Kranti B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ff9761db1faa1460e27b4ede45ea06864712590bd05d7ff12b360f63975c0187, cn=Kranti B. Patil
Date: 2018.04.18 16:59:35 +05'30'

(क्रांती पाटील)
कक्ष अधिकारी, गृह विभाग

प्रति,

१. प्रबंधक, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,मुंबई व राज्य परिवहन
२. अपील न्यायाधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
६. निवड नस्ती, परिवहन-५